कार्यालय प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, गडचिरोली.

क्रमांक स.अ.(बांध.)/बायोमॅट्रीक/४३२९ /२०२५, दिनांक: ९० /१०/२०२५.

निवीदा/दरपत्रक सुचना

याद्वारे कळविण्यांत येते की, खाली दिलेल्या वर्णनाचे गडचिरोली मुख्यालयामध्ये ०४ आस्थापना आणि तालुका स्तरावरील न्यायालयामध्ये ०८ आस्थापना अशा एकूण १२ बायोमॅट्रीक मशिन खरेदी करुन कार्यान्वित करण्याकरीता ईच्छुक प्रतिष्ठानांची तुलनात्मक दराची सिलबंद निवीदा मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, गडचिरोली यांच्या नावाने **दिनांक २९/१०/२०२५** च्या सायंकाळी ५.४५ वाजेपर्यंत जिल्हा न्यायालय, गडचिरोली येथे सादर करण्यांत यावे. तसेच लिफाफ्यावर **''बायोमॅट्रीक मशिन खरेदी करुन कार्यान्वित करण्याबाबतची निविदा''** असे नमुद करावे.

अ.क.	कार्यालयाचे नांव	कर्मचा-यांची संख्या	एकुण युनीट
१	जिल्हा न्यायालय, गडचिरोली	१२५	१
२	जिल्हा न्यायालय-१ तथा अतिरिक्त सत्र न्यायालय, अहेरी	१८	१
३	दिवाणी न्यायालय (वरिष्ठ स्तर), गडचिरोली	५७	१
४	मुख्य न्यायदंडाधिकारी, गडचिरोली	१७	१
५	सह दिवाणी न्यायालय (कनिष्ठ स्तर), गडचिरोली	२८	१
६	दिवाणी न्यायालय (कनिष्ठ स्तर), आरमोरी	१५	१
७	दिवाणी न्यायालय (कनिष्ठ स्तर), देसाईगंज	२४	१
८	दिवाणी न्यायालय (कनिष्ठ स्तर), कुरखेडा	१६	१
९	दिवाणी न्यायालय (कनिष्ठ स्तर), धानोरा	१२	१
१०	दिवाणी न्यायालय (कनिष्ठ स्तर), चामोर्शी	२०	१
११	दिवाणी न्यायालय (कनिष्ठ स्तर), अहेरी	११	१
१२	दिवाणी न्यायालय (कनिष्ठ स्तर), सिरोंचा	२२	१
	एकुण	**३६५**	**१२**

Sr. No.	Specification of device	Quantity
1	**Hikvision :- DS-K1T320EFWX-B** • 2.4 inch LCD Screen, 2 MP lens, Multiple authentication methods, including face, finger print, card and PIN etc., Suppotrs EM card, Face Capacity : 500, Fingerprints Capacity : 1000, Cards Capacity : 1000 & Event Capacity : 1,00,000, ROM : 4GB, RAM : 256 MB, Audio output :Built in buzzer, Face recognition distance :0.3m˜1.5m Card type : EM card, Card reading distance : 0˜5 cm, Card reading duration :<1 s • Network conneectivity, Software comptable with window 10/11 & Ubuntu	12

2	**MANTRA :- MFS110 (Optical Fingerprints Scanner)** • Fingerprint Sensor Type : Optical Sensor, Spatial Resolution : 500 DPI + /- 2 %, Platen Area : 14.0 mm x 17.0 mm, Image size : 276 x 336 Pixels, Image Grayscale : 256 (8-Bit Gray Level), Light Souce : Red LED, Maximum Acqusition time (Placement to Template) : <2 Sec., Approx. Dimension (L x W x H) : 61 (L) x 91(W) x 54 (H) mm, Approx. Weight : 0.140kg • USB conneectivity, comptable with window 10/10 & Ubuntu	01

अटि व शर्ती व आवश्यक सेवा सुविधा :-

१. बायोमेट्रिक मशीन उच्च दर्जाची व एक वर्ष गॅरटी/वॉरंटी सह असावी.

२. प्रस्ताव सादर करणा-या संस्थेकडे कंपनीचे ऑथराईजेशन सर्टिफिकेट असल्यास अशा संस्थेला प्राधान्य दिले जाईल.

३. वर नमुद केलेल्या सर्व आस्थापनांमध्ये बायोमेट्रिक मशीन स्थापीत व संगणक नेटवर्क मध्ये स्थापीत (Install) करून द्यावी लागेल, त्याकरीता लागणारे केबल व ईतर अनुषंगीक साहित्य पुरविण्याची जबाबदार स्थापीत करून देणा-या संस्थेवर राहील. त्याकरीता वेगळे शुल्क कार्यालयाकडुन मिळणार नाही.

४. वर नमुद केलेल्या विभागातील/आस्थापनातील संगणकामध्ये हजेरीचे सॉफ्टवेअर इन्स्टॉल करून त्याचे वापराचे लायसन असावे.

५. सदर बायोमेट्रिक मशीनमध्ये रजा, सार्वजनिक सुट्या अद्यावत करण्याची सुविधा असणे आवश्यक आहे.

६. संबंधीत आस्थापनेतील सर्व कर्मचा-यांची नावे व त्यांचे बायोमेट्रिक रेकॉर्ड जसे- फिंगर प्रिंट,फेस आणि कार्ड बायोमेट्रिक मशीनमध्ये भरण्याबाबतचे प्रशिक्षण देणे अनिवार्य राहिल.

७. बायोमेट्रिक मशीन मध्ये कर्मचा-यांची संख्या ५०० किंवा त्यापेक्षा जास्त असलेले डिवाइस असणे आवश्यक आहे.

८. संबंधीत आस्थापनेला आवश्यक त्या पद्धतीचे हजेरीरिपोर्ट तयार करून ते कसे काढावे यासंबंधी सॉफ्टवेअर मध्ये सर्व सुविधा असाव्यात.

९. आस्थापना नियामानुसार वेळोवेळी आवश्यक असलेले बदल हजेरी रिपोर्टमध्ये करून द्यावे लागतील.

१०. दर महिन्याला मशीनमधील हजेरीचा डाटा संगणकावर घेवून त्याचे रिपोर्ट तयार करण्यासाठी प्रत्यक्षात भेट देवून मार्गदर्शन करावे लागेल.

११. एक वर्षापर्यंत मशीन व त्याच्या सॉफ्टवेअरमध्ये किंवा जोडणीमध्ये कुठलाही तांत्रीक बिघाड निर्माण झाल्यास तो तात्काळ दुरूस्त करून द्यावा लागेल.

१२. एक वर्षाचे गॅरंटी कालावधीत हजेरी रिपोर्ट काढुन देण्याकरीता सेवा पुरविणे किंबहुना मार्गदर्शन करणे बंधनकारक राहील.

१३. एक वर्षापर्यंत कर्मचा-यांची बदली किंवा इतर फेरबदल जे आवश्यक असतात ते सर्व आपणास करून द्यावे लागतील.

१४. वर्षभराची वॉरंटी सेवा व सुविधा संबंधी कुठलीही अतिरिक्त रक्कम देण्यात येणार नाही. मूळ पुरवठा किंमतीमध्ये सर्व समाविष्ट असावे.

१५. वरील सर्व सुविधांसह हजेरीसाठीचे बायोमेट्रिक मशीन लावण्यासंबंधी प्रस्ताव या कार्यालयास किमतीसह सादर करावा. त्यात आपण पुरवीत असणा-या बायोमेट्रिक मशीन संबधी सर्व तांत्रीक डिटेल असलेले पत्रक सोबत जोडावे.

१६. बायोमेट्रिक मशीनचे दर हे सर्व करासहीत असले पाहीजे.

१७. सादर केलेल्या बायोमेट्रिकच्या प्रस्तावासंबंधी व मशीनच्या दर्जासंबंधी खात्री करूनच निवीदा मंजूर करण्याचा व नाकारण्याचा तसेच संख्येत वाढ किंवा घट करण्याच्या अधिकार खरेदी समिती तसेच माननीय प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश महोदय यांना राहील.

१८. सदरहू बायोमेट्रिक यंत्रणा स्थापीत करण्यासंदर्भात कार्यालयाकडुन स्थापीत करणा-या संस्थेस आगाऊ रक्कमेचे प्रदान केले जाणार नाही.

१९. बायोमेट्रिक यंत्रणा स्थापीत करण्यासंदर्भात कार्यालयाने आदेश दिल्यास दिलेल्या मुदतीतच स्थापीत करून देणे अनिवार्य राहील. अन्यथा विलंब लावल्यास किंवा स्थापीत करून देण्यास टाळाटाळ केल्यास दिलेला आदेश रद्द समजण्यात येईल. याची जबाबदारी संबंधीत प्रतिष्ठानाची राहील.

२०. सदरहू प्रस्ताव सादर करणा-या संस्थेने यापूर्वी कोणत्याही शासकिय किंवा निमशासकिय संस्थेमध्ये बायोमेट्रिक यंत्रणा स्थापीत व कार्यान्वीत करून दिल्याबाबतचे आदेशाच्या प्रती प्रस्तावासोबत जोडणे अनिवार्य आहे.

२१. बायोमेट्रिक चा प्रस्ताव हा संपूर्ण अपेक्षीत खर्चासहीत सादर करणे अनिवार्य राहील. सादर केलेला खर्चाचा प्रस्ताव हा अंतीम समजण्यात येईल.

२२. दरपत्रकामध्ये जि.एस.टी. क्रमांक नमुद करावे तसेच सोबत पॅन कार्डची छायांकित प्रत जोडावी. त्याचप्रमाणे स्थानीक प्रशासनाकडील परवानाची छायाकिंत प्रत जोडावी अन्यथा दरपत्रक / निवीदा रद्द करण्यात येईल.

आदेशान्वये

प्रभारी प्रबंधक

जिल्हा न्यायालय, गडचिरोली

निविदा सुचनेची प्रत जिल्हा न्यायालयाच्या नोटीस बोर्डावर तसेच संकेतस्थळावर प्रकाशीत करण्यात यावी.

प्रभारी प्रबंधक

जिल्हा न्यायालय, गडचिरोली